## खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत

## जाहीर नोटीस

### उपजिल्हाधिकारी(भूसंपादन) वि.पा.वि.मं.क्र-1 भंडारा यांचे कार्यालय भंडारा

भुसंपादन प्रकरण क्रमांक 04 /एलक्युएन/2020-21
मौजा-चांदी तालुका –पवनी, जिल्हा - भंडारा

क्रमांक /अका/उपजि(भू.)/विपाविमक्र.1/कावि/135/2021 दिनांक 4/03/2021

ज्याअर्थी **कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही (पवनी) यांनी गोसीखुर्द उजवा कालवा सा.क्र.२१४६० मी.वरुन निर्गमित शेळी उपसा सिंचन योजनेकरिता पंप हाउस करिता महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक** संकिर्ण 03/2015/ प्र. क्र. 34/अ-2 दिनांक 12/05/2015 मधील तरतूदी अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने **कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही (पवनी) यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र जावक.क्रमांक.५८५/चिशा/ भूसं.प्रस्ताव/गोडाकावि/२०२० दिनांक १६/०३/२०२० अन्वये** प्रस्ताव जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे सादर केला आहे. **(जिल्हाधिकारी कार्यालयास सदर प्रस्ताव प्राप्त दिनांक ११/०२/२०२१.)**

आणि ज्याअर्थी जिल्हाधिकारी भंडारा यांचे आदेश क्र. कार्या-11/क.लि./भूसंपादन./कावि/175/2021 दिनांक 16/02/2021 अन्वये वरील शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याअर्थी, आता

1.उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वि.पा. वि. मं. क्र. - 1 भंडारा, याद्वारे.

(एक) **अनुसुची** - एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने **कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही (पवनी)** यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि

(दोन) **गोसीखुर्द उजवा कालवा सा.क्र.21460 मी.वरुन निर्गमित शेळी उपसा सिंचन योजनेकरिता** जमीन थेट खरेदीने घेतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 च्या शेडयुल-1 च्या तुरतुदी नुसार संबंधीत जमीनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर 25 टक्के सरळ खरेदी संमती अनुदान रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.



Scanned with CamScanner

**(तीन)संबंधित** भूधारकांकडुन शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे **कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही (पवनी)** यांचे नावे खरेदीने देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमत्तीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

1. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमत्तीपत्रे (विकल्प), सहाय्यक कार्यकारी अभियंता गोसीखुर्द डावा कालवा उप विभाग क्रं.4 गोसीखुर्द (चकारा) यांचे कार्यालयात दाखल करावीत.
2. संमत्तीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना सहाय्यक कार्यकारी अभियंता गोसीखुर्द डावा कालवा उप विभाग क्रं.4 गोसीखुर्द (चकारा) यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / **कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द डावा कालवा विभाग वाही (पवनी)** चे प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.
3. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) वि. पा. वि. म. क्र. 1 भंडारा व सहाय्यक कार्यकारी अभियंता गोसीखुर्द डावा कालवा उप विभाग क्रं.4 गोसीखुर्द (चकारा) यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.
4. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रात (मसुद्यामध्ये) प्रसिध्द केलेल्या क्षेत्रात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत हितसंबंधीत व्यक्तींनी नोंद घ्यावी.

Bhaske
04/03/202

**( एस.एस.भस्के )**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**वि. पा. वि .मं. क्र. 1 भंडारा**

Scanned with CamScanner

# अनुसूची

## मौजा-चांदी त. सा. क्र. 39

## तालुका—पवनी जिल्हा - भंडारा

| अ. क्र. | भुमापन क्रमांक | संपादना खालील क्षेत्र हे. आर.चौ.मी. | भोगवट दार वर्ग | दर हेक्टरी शेतसारा आकारणी | आकारणी गट क्रमांक | जमिनीचा प्रकार | भुधारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | 46/1 | 0.03 | 1 | 2.13 | II | जिरायत | बाळकृष्ण जगन घुटके |
| 2. | 46/2 | 0.02 | 1 | 2.20 | II | जिरायत | बाळकृष्ण जगन घुटके |
| 3. | 45 | 0.03 | 1 | 3.33 | III | जिरायत | चंद्रभागा रामकृष्ण वाघ |
| 4. | 44 | 0.02 | 1 | 4.07 | III | जिरायत | विलास चंद्रभान वरकडे,कचरु चंद्रभान वरकडे ,विजया उदाराम मसराम |
| 5 | 43 | 0.05 | 1 | 4.07 | III | जिरायत | कचरु चंद्रभान वरकडे ,विजया उदाराम मसराम, विलास चंद्रभान वरकडे |
| 6 | 258 | 0.04 | 1 | 2.94 | III | जिरायत | सखाराम शिवा वाकडे,बनाबाई शिवा वांकडे,सायत्रा शिवा वाकडे |
| 7 | 13 | 0.03 | 1 | 3.68 | III | जिरायत | तुकाराम शिवाजी वाकडे |
| 8 | 12/1 | 0.05 | 1 | 3.70 | III | जिरायत | कौसल्याबाई नानाजी देशमुख,राईबाई श्रीराम भोंबले |
| 9 | 3/1 | 0.01 | 1 | 5.50 | IV | हं.वलीत | सुत्यभामा सहादेव राणे |
| 10 | 3/5 | 0.07 | 1 | 5.62 | IV | हं.वलीत | विलास नत्थु रंधये |
| एकुण | | 0.35 | | | | | |

भंडारा

दिनांक 4/03/2021

Bhaske 04/03/202

( एस.एस.भस्के )

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)

वि.पा.वि.मं.क्र.1 भंडारा

Scanned with CamScanner